महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३३ वा दिनांक : २१/१०/२०२४ वार : सोमवार

## 'लाडकी बहीण योजना जुगाड' म्हणणे भोवले : भाजपने आमदार टेकचंद सावरकरांना यादीतून डावलले



**मुंबई :** आमदार टेकचंद सावरकर यांना महिनाभरापूर्वी लाडकी बहीण योजनेबद्दल केलेले वक्तव्य भोवले आहे. लाडकी बहीण योजना मतांसाठी केलेला जुगाड असल्याचे टेकचंद सावरकर म्हणाले होते. त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. सावरकरांनी केलेल्या वक्तव्यामुळे सरकारविरोधात महाविकास आघाडीच्या हाती आयते कोलीत सापडले. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपने त्यांना यादीतून डावलले, अशी चर्चा आहे.

टेकचंद सावरकर हे कामठी विधानसभा मतदारसंघातून आमदार आहेत. मात्र, यंदा भाजपच्या पहिल्या यादीत कामठी मतदारसंघातून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना संधी देण्यात आली आहे. गेल्या निवडणुकीत भाजपने सलग तीन टर्म आमदार असलेल्या बावनकुळेंचे तिकीट कापून टेकचंद सावरकरांना संधी दिली होती. आता भाजपने कामठीमधून सावरकर यांचे तिकीट कापून पुन्हा एकदा बावनकुळेंना संधी दिली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेला जुगाड म्हणणे सावरकर यांना भोवले, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

काय म्हणाले होते सावरकर? आम्ही इतकी मोठी भानगड कशासाठी केली? हे तुम्ही इमानदारीने सांगा. ज्या दिवशी तुमच्या घरासमोर मतदानाची पेटी येईल, त्यावेळी माझ्या लाडक्या बहिणी भाजपला मतदान करतील, यासाठी आम्ही हा जुगाड केलाय. हे सर्वजण खोटे बोलले असतील. मात्र, मी खरे बोलतो. माझे बोलणे खरे आहे की नाही? नाहीतर बोलायचे एक आणि करायचे एक, असे करायला मी रामदेव बाबांचा कार्यकर्ता आहे का? असे टेकचंद सावरकर यांनी म्हटले होते. त्यांच्या या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

दरम्यान, या व्यक्तव्यावरून टेकचंद सावरकर यांनी स्पष्टीकरण देखील दिले होते. एका मेळाव्यातील माझ्या भाषणाचा विपर्यास करण्यात आला. माझा असा कोणताही हेतू नव्हता. लाडकी बहीण योजना ही महिलांसाठी आहे. मी एकट्याने काही म्हटले तर काहीही होणार नाही. काँग्रेसकडे विकासाबद्दल बोलण्यासाठी काही नसल्यामुळे काँग्रेसने माझ्या भाषणातील तेवढीच क्लिप व्हायरल केली, असे सावरकर म्हणाले.

## मस्क म्हणाले- EVM मुळे निवडणुकीत हेराफेरी होते



**पेनसिल्व्हेनिया :** अमेरिकन उद्योगपती एलॉन मस्क यांनी दावा केला आहे की, ईव्हीएमचा वापर करून निवडणुकीत हेराफेरी केली जाते. अमेरिकन न्यूज एजन्सी एबीसीच्या वृत्तानुसार, मस्क म्हणाले की, निवडणुका बॅलेट पेपरद्वारे घेण्यात याव्यात.

मस्क यांनी डोमिनियन कंपनीच्या मतदान यंत्रांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की फिलाडेल्फिया आणि ऍरिझोना व्यतिरिक्त या मशीन्स इतरत्र कुठेही वापरल्या जात नाहीत. या दोन्ही ठिकाणी रिपब्लिकन पक्षाचा पराभव झाला. हा एक विचित्र योगायोग आहे.

मस्क म्हणाले की संगणक प्रोग्राम हॅक करणे सोपे आहे त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवता येत नाही.

मशीन बनवणाऱ्या कंपनीने हे आरोप फेटाळून लावले आहेत

व्होटिंग मशीन बनवणारी कंपनी डोमिनियनने मस्कचा आरोप खोटा असल्याचे म्हटले आहे.

कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले की डोमिनियन फिलाडेल्फिया राज्यात सेवा देत नाही. तसेच, आमची मतदान प्रणाली मतदाराला बॅलेट पेपरवर दिलेल्या मताची पुष्टी करण्यास मदत करते. याशिवाय, आम्ही अनेक वेळा मशिन व्होट आणि बॅलेट पेपर मतांची मोजणी एकत्र करून ऑडिट केले आहे. हे सिद्ध होते की आमचे मशीन योग्य परिणाम देते.

निवडणुकीसाठी अवघे १५ दिवस उरले आहेत

अमेरिकेत ५ नोव्हेंबरला राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका होत आहेत. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प तिसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात आहेत, तर डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस आहेत. या निवडणुकांमध्ये एलॉन मस्क उघडपणे ट्रम्प यांच्या समर्थनार्थ प्रचार करत आहेत.

मस्क यांनी ट्रम्प यांच्या पक्षाच्या राजकीय कृती समितीला $७५ दशलक्ष (सुमारे ६३० कोटी रुपये) निधीही दिला आहे. यासोबतच मस्क २०२४ च्या निवडणुकीत सर्वाधिक निधी देणारे उद्योगपती बनले आहेत.

## जास्तीत जास्त मुले जन्माला घाला, चंद्राबाबू नायडू यांचे जनतेला आवाहन

**तमीळनाडू :** वृद्धांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता जोडप्यांनी जास्तित जास्त मुले जन्माला घाला असा अजब सल्ला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी एका कार्यक्रमात बोलताना दिला आहे. यावेळी चंद्राबाबू यांनी वृद्धांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त केली आहे.

"लोकसंख्या घटणे आणि तरुणांचे स्थलांतर ही बाब राज्यासाठी धोकादायक आहे. दोनापेक्षा जास्त मुलं जन्माला घालण्यासाठी आम्ही जोडप्यांना प्रोत्साहन देणार आहोत. दोन पेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या जोडप्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यास प्रतिबंध करणारा पूर्वीचा कायदा आम्ही रद्द केला आहे. दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या लोकांनाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवता याव्यात, यासाठी सरकार कायदा आणण्याचा विचार करत आहे, असे चंद्राबाबू नायडू यांनी सांगितले आहे.देशात प्रजनन दर हा सरासरी २.१ आहे तर आपल्या राज्यात हा दर १.६ वर आला आहे. राज्यात वृद्धांची संख्या वाढत चालली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील खेडे गावांमध्ये केवळ वृद्ध लोक आहेत. कारण तरुण पिढी देशाच्या विविध भागात आणि परदेशात स्थलांतरित झाले आहेत. राज्याच्या दृष्टीने हे चांगले नाही. या दिशेने पावले न उचलल्यास आंध्र प्रदेशला जपान आणि युरोपसारख्या परिस्थितीला सामोरे जावं लागेल", अशी चिंता चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केली.

## नांदेड पोटनिवडणुकीत नवनीत राणा उमेदवारी देण्याची कार्यकर्त्यांची मागणी



**अमरावती :** केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. नवनीत राणा या नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवणार असल्याची चर्चा सुरू आहे. नवनीत राणा यांना भाजपने नांदेड लोकसभेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी भाजपच्या एका गटाकडून करण्यात आल्याची माहिती आहे. कारण नांदेड येथे शीख धर्मियांचे तीर्थस्थळ आहे, तर नवनीत राणा यांचे वडील मूळ पंजाबचे आहेत, त्यामुळे त्या तिथे जिंकतील, असे या गटाचे म्हणणे आहे.

२०२४ लोकसभा निवडणुकीत नवनीत कौर राणा यांचा पराभव झाला होता.

काँग्रेसचे बळवंत वानखेडे यांनी त्यांचा पराभव केला होता. त्यामुळे भाजपने नवनीत राणा यांना नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत उमेदवार द्यावी अशी मागणी होत आहे. भाजपच्या एका गटाकडून ही मागणी करण्यात आली. आता या मागणीवर भाजप पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात, हे पहावे लागणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ ऑक्टोबर २०२४


## भाजपने शिवसेनेच्या ५ जागांवर केले उमेदवार जाहीर : इतर जागांवरही दावा



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत एकूण ९९ जणांना संधी देण्यात आली आहे. यापैकी पाच मतदारसंघ भाजपने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या खेचल्या असल्याचे दिसत आहे. धुळे शहर, अचलपूर, देवळी, नालासोपारा, उरण या पाच मतदारसंघात भाजपने आपला उमेदवार जाहीर केला आहे.

धुळे येथे २०१९ साली शिवसेनेचे हिलाल माळी हे उमेदवार होते, मात्र येथून भाजपने यंदा अनुप अग्रवाल यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अचलपूर येथे शिवसेनेकडून सुनिता फिसके या उमेदवार होत्या, येथे भाजपने आता अतुल तायडे यांना उमेदवारी दिली आहे. देवळी मतदारसंघात शिवसेनेचे समीर देशमुख उमेदवार होते, त्यांचा मागच्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता, यंदा भाजपने राजेश बकाने यांना उमेदवारी दिली आहे. नालासोपारा येथे शिवसेनेकडून प्रदीप शर्मा उमेदवार होते, यंदाच्या निवडणुकीत भाजपने राजन नाईक यांना उमेदवारी दिली आहे. तर उरण येथे शिवसेनेकडून मनोहर भोईर हे उमेदवार होते, यंदा भाजपने महेश बालदी यांना उमेदवारी घोषित केली आहे.

दरम्यान, गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महायुतीच्या झालेल्या बैठकीत त्याग करण्याचा सल्ला दिला होता. मुख्यमंत्री पदासाठी आम्ही त्याग केला आहे, तर जागावाटपासाठी तुम्ही त्याग करा, असा सल्ला अमित शहा यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिला होता. त्यानुसार भाजपने शिवसेनेच्या या पाच मतदारसंघात उमेदवार घोषित केला असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे या पाच मतदारसंघातील नालासोपारा येथे भाजपचा आमदार तसेच भाजपचा पाठिंबा असलेला अपक्ष उमेदवार नसताना देखील भाजपने या मतदारसंघात उमेदवार घोषित केला आहे.

भाजपने आखलेल्या या रणनीतीवर शिवसेना शिंदे गटाचे नेते काय प्रतिक्रिया देतात याकडे देखील आता सर्वांचे लक्ष असणार आहे. तसेच भविष्यातील जगांवर देखील या रणनीतीचा परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे. यात पालघर, बोईसर या जागांचा समावेश असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजप आता शिवसेनेच्या या जगांवर देखील उमेदवार जाहीर करणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## भाजपने दुर्लक्ष केल्यास माळी समाज बिघडवू शकतो सत्तेचे गणित - गोविंद वैराळे

**नागपूर** : माळी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रात सुमारे दीड कोटी आहे. इतर प्रांतात ८ ते १० कोटी व पूर्ण भारतात एकूण माळी समाजाची संख्या १० ते १५ कोटी असावी. आज महाराष्ट्रात माळी समाजाची संख्या तीन नंबरवर आहे. एकेकाळी १९-२० आमदार निवडून यायचे आता ५ ते ७ च्या वर आपले विधानसभा सदस्य नसतात. हे लक्षात घेता माळी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी अ. भा. माळी महासंघाचे विश्वस्त गोविंद वैराळे यांनी केली आहे. राज्यात किमान २० ते २५ आणि विदर्भात ४ ते ५ जागी माळी समाजाला प्रतिनिधित्व देण्याची मागणी वैराळे यांनी केली आहे.

भाजपकडून समाजाला जास्त अपेक्षा

माळी समाजाला डावलण्यात आले तर गंभीर परिणाम राजकीय पक्षाला भोगावे लागतील, असा इशारा गोविंद वैराळे यांच्यासह मधुसूदन देशमुख, माळी महासंघाचे विभागीय अध्यक्ष मुकुंद पोटदुखे, जिरे माळी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र वाठ आदींनी दिला आहे. माळी समाजाचे उमेद्वार आणि कार्यकर्ते हे राष्ट्रीय भारतीय जनता पार्टीमध्ये जास्त असल्याने व गेल्या दोन दशकांपासून माळी समाजाचे मत हे भाजपला जात असल्याने भाजपकडून समाजाला जास्त अपेक्षा आहे, असे वैराळे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ३५ जिल्हे आहेत. माळी समाज हा ग्रामीण भागात जास्त वसलेला असल्याने कोकण विभाग आणि मुंबई उपनगरचे ६ जिल्हे ज्यांची लोकसंख्या २०११ च्या सेन्सस प्रमाणे २.५ करोड आहे. यात माळी समाजाची संख्या अगदीच नगण्य आहे. उर्वरित महाराष्ट्राची लोकसंख्या ८.५ करोड आहे. यात पश्चिम महाराष्ट्रातील ५ जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातले ५ जिल्हे, मराठवाड्यातील ८ जिल्हे, आणि विदर्भातील ११ जिल्हे यात विभागली आहे.

यातही नंदुरबार, नांदेड, हिंगोली, गडचिरोली, कोल्हापूर, सांगली, वर्धा, यवतमाळ व लातूर या ९ जिल्ह्यांमध्ये माळी समाजाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. नागपूर, भंडारा, गोंदिया, वाशीम, सातारा, बीड, जालना, संभाजीनगर, परभणी, धाराशिव व धुळे या ११ जिल्ह्यांमध्ये एकूण लोकसंख्येच्या ८ ते १२ टक्के पर्यंत कमी अधिक प्रमाणात आढळून येतो. त्यातही ग्रामीण भागात प्रमाण जास्त आहे .

अमरावती, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, जळगाव, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, पुणे या ९ जिल्ह्यांमध्ये एकूण लोकसंख्येच्या १५ ते २० टक्केच्या प्रमाणात माळी समाज आढळून येतो. १२ टक्के वरील लोकसंख्या असलेला आकडा निवडणूक जिंकण्याकरीता सोयीचा आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## राज्यातील मतदारसंघात मतदार यादीत भाजपचा घोळ : चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रत्युत्तर



**नागपूर** : महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत होणारा पराभव स्पष्ट दिसू लागल्याने मतदार याद्यात घोळ केल्याचा आरोप पराभूत मानसिकतेमधून केला जात असल्याचा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. एरव्ही ईव्हीएमवर बोलणारे मविआचे नेते आता मतदार यादीवर बोलू लागले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. ते नागपूरच्या कोराडी येथे माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाविकास आघाडीमध्ये वाद असून केवळ भाजपा आणि महायुतीचा विरोध करण्यासाठी एकत्र आले आहेत. त्यांच्याकडे कोणतीही विचारधारा नाही. मविआचे देशासाठी समर्पण नाही, अजेंडाही नाही. निव्वळ जाती-पातीचे राजकारण करून सामाजिक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. दिवसभर राजकारण आणि फेक नॅरेटिव्ह पसरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. एक दिवस असा येईल, की ज्या दिवशी मविआमधील सर्व उमेदवारीसाठी मारपीट करतील. दुसरीकडे भाजपा-महायुती विचारधारेतून आणि महाराष्ट्राच्या विकासाचा अजेंडा घेऊन काम करीत आहे.

मतदार याद्यांमध्ये सुधारणा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी नावे मोठ्या संख्येत गहाळ झाल्याचे उघड झाले होते. महाराष्ट्रात अशा मतदारांची संख्या मोठी होती. ही नावे का गायब झाली? कशी गायब झाली? कुणाच्या आदेशाने गायब झाली? या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी यासाठी भाजपाच्या शिष्टमंडळाने माझ्या नेतृत्वात केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतली होती. तेव्हा मविआचे नेते का चुप्प होते? तेव्हा हा प्रश्न का उपस्थित केला नाही?, असाही प्रश्न त्यांनी विचारला. आता कॉंग्रेस घाबरली आहे. लोकशाही मजबूत करण्यासाठी आम्ही अधिकाधिक मतदान करा,असे जनतेला आवाहन करणारा असल्याचे ते म्हणाले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ ऑक्टोबर २०२४


## माझ्यावर पुन्हा दाखलेला विश्वास सार्थ ठरवण्याचाच प्रयत्न असेल - भाजपची यादी जाहीर झाल्यावर फडणवीसांची प्रतिक्रिया



**नागपूर :** भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. भाजपच्या पहिल्या यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांत पाटील, आशिष शेलार या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये अनेक बहुतांश विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी दिली गेली आहे.

तर काही नवीन चेहऱ्यांचीही वर्णी लागली आहे. पक्षनेतृत्त्वाने माझ्यावर पुन्हा दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्याचाच माझा प्रयत्न असेल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. फडणवीस यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

काय म्हणाले फडणवीस? देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पार्टीने मला विधानसभा निवडणुकीसाठी सहाव्यांदा संधी दिली. भारतीय जनता पार्टीने पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखविल्याबद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह आणि मा. भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डाजी तसेच केंद्रीय निवडणूक समितीतील सर्व सन्माननीय नेत्यांचा मी नितांत आभारी आहे.

पक्षनेतृत्त्व, माझ्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील नागरिक आणि माझ्या महाराष्ट्रातील मायबाप जनतेने सातत्याने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्याचाच माझा प्रयत्न असेल.

भाजपाच्या पहिल्या यादीत माझ्याव्यतिरिक्त आणखी ९८ उमेदवार जाहीर झाले आहेत, त्यात आपले प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचाही समावेश आहे. त्यांच्यासह या उमेदवार यादीतील सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांना खूप खूप शुभेच्छा!

# भाजपकडून गणपत गायकवाडांचे तिकीट कापले

कल्याण : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत अनेक नवीन चेहऱ्यांना देखील संधी देण्यात आली असल्याचे दिसत आहे. तसेच अनेकांचे तिकीट कापल्याचे देखील समोर आले आहे. कल्याण पूर्व मतदारसंघातील विद्यमान आमदार गणपत गायकवाड यांचे तिकीट कापण्यात आले आहे.

भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी पोलिस ठाण्यात जाऊन शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. सुदैवाने महेश गायकवाड आणि त्यांचे सहकारी राहुल पाटील या गोळीबारात बचावले होते. मात्र, या घटनेची चर्चा देशभरात झाली होती. तसेच तेव्हापासून गणपत गायकवाड हे तुरुंगात आहेत. याचाच परिणाम म्हणून गणपत गायकवाड यांचे तिकीट भाजपने कापले असल्याचे दिसत आहे.

गणपत गायकवाड यांचे तिकीट जरी कापण्यात आले असले तरी देखील त्यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी तिकीट जाहीर केले आहे. सुलभा गायकवाड या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. गणपत गायकवाड तुरुंगात गेल्यानंतर सुलभा गायकवाड यांनी राजकारणात देखील सक्रिय सहभाग नोंदविण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी सुलभा गायकवाड यांच्या नेतृत्वात कल्याण पूर्वमध्ये भाजपने महायुतीच्या उमेदवारासाठी काम केले व सुलभा गायकवाड यांनी प्रचार देखील केला होता.

भाजपने सुलभा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली आहे, तर दुसरीकडे शिंदे गटाचे नीलेश शिंदे यांचे देखील शहरात बॅनर झळकत आहेत, याच सोबत शिंदे गटातूनच विशाल पावशे हे देखील इच्छुक उमेदवार आहेत. त्यामुळे आता शिंदे गटाकडून कोणाला उमेदवारी दिली जाते याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी तर उमेदवारी नाही मिळाली तर बंड पुकारू, असा थेट इशाराच दिला आहे.

## विधानसभेसाठी उमेदवार उतरवणार - मनोज जरांगे

**जालना :** येथील आंतरवाली सराटीत गेल्या काही दिवसांपासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करत असलेले मनोज जरांगे पाटील यांनी आगामी निवडणूक संदर्भात त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.

. आजच्या बैठकीत जरांगे पाटील म्हणाले- जिथे उमेदवार निवडणून येण्याची शक्यता आहे तिथेच आपले उमेदवार उभे करा. याचबरोबर एससी आणि एसटीच्या जागा असलेल्या ठिकाणी आपला उमेदवार द्यायचा नाही.

ते पुढे म्हणाले- जे कोणी निवडणुकीसाठी इच्छुक आहेत, त्या सर्वांनी अर्ज भरावेत. अर्ज भरण्याच्या शेवटीच्या दिवसापर्यंत मी मतदारसंघाचा अंदाज घेऊन कोणाचा अर्ज ठेवायचा आणि कोणाचा मागे घ्यायचा याचा निर्णय देईल

समीकरणे जुळवणे आवश्यक आहे. सर्व उमेदवारांनी फॉर्म भरुन ठेवावेत. पण फॉर्म काढ म्हटल्यावर काढून घ्यायचा. तसे न केल्यास मी त्या मतदारसंघात लक्ष घालणार नाही. आपल्या मागण्या मान्य असणाऱ्यांना मतदान द्यायचे, असे जरांगे म्हणाले. वेळोवेळी सूचना केल्या जातील, त्या पाळाव्यात. समीकरण जुळल्यानंतर पुढील मार्ग सोपा होईल, असेही जरांगे म्हणाले. ३६ मतदारसंघांमध्ये मराठ्यांचे १ लाख मतदार असल्याचे जरांगे म्हणाले.

# शिवसंग्रामच्या ज्योती मेटेंचा शरद पवार गटात प्रवेश



**मुंबई :** विधानसभा निवडणकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात नेत्यांची इनकमिंग मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसत आहे. शिवसंग्रामच्या नेत्या तथा दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. सुप्रिया सुळे आणि शरद यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. त्यांना पक्षाकडून बीडमधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे.

ज्योती मेटे लोकसभेसाठीही होत्या इच्छुक मराठा आरक्षणाबाबत नेहमी आग्रही राहिलेले शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या ज्योती मेटे या पत्नी आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तीव्र आंदोलने झाल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर शरद पवारांकडून मराठा आंदोलनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सांगड घालण्यात येते असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, ज्योती मेटे यांनी दोन दिवसांपूर्वी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली होती. ज्योती मेटे यांची लोकसभा निवडणूक देखील लढण्याची इच्छा होती. त्यासंदर्भात त्यांनी शरद पवार गटासोबत चर्चाही केली होती.

मात्र, ऐनवेळी त्यांनी बीड लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली. व्यापक समाजहित लक्षात घेऊन बीड लोकसभेच्या मैदानातून माघार घेत आहोत, असे ज्योती मेटे यांनी त्यावेळी सांगितले होते.

शरद पवारांकडे नेत्यांची रांग विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. भाजपचे हर्षवर्धन पाटील, अजित पवार गटाचे दीपक चव्हाण बबन तसेच फलटण येथील निंबाळकर गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नुकताच प्रवेश केला आहे.

तर माढ्याचे आमदार बबन शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेतली होती. त्यामुळे ते देखील तुतारी फुंकण्याच्या तयारीत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यात आता शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांनीही आज राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. दरम्यान, लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे यश पाहता लोकांचा शरद पवारांवर विश्वास वाढला असे, पक्षाच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे.

# लोकसहभागातून शाळांमध्ये बसवले २०० सीसीटीव्ही

**छत्रपती संभाजीनगर :** बदलापूर येथील चिमुरडीवर शाळेत झालेल्या अत्याचाराच्या प्रकरणामुळे महाराष्ट्रभरात सर्वच पालकांच्या मनात मोठे चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे पालक आपल्या पाल्याना शाळेत पाठवताना विचार करायला लागली होती. सरकारने सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे निर्देश दिले. काही शाळांनी कॅमेरे लावलेही मात्र सरकारी शाळा यामध्ये पाठीमागे राहिल्याचा पाहायला मिळाल्या. यामुळे फुलंब्री बाजार समितीच्या सभापती अनुराधा अतुल चव्हाण यांनी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, होर्डिंग्स, बॅनर, भेटवस्तू न आणता शाळेत सीसीटीव्ही लावण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले होते.

या आवाहनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. यामध्ये सभापती अनुराधा चव्हाण यांनी देखील मोठ्या प्रमाणात आर्थिक हातभार लावत फुलंब्री मतदार संघातील तब्बल दोनशे पेक्षा अधिक शाळांत सीसीटीव्ही संच लावले आहेत.

किनगावला आदर्श गाव म्हणून पुढे आणणाऱ्या सभापती अनुराधाताई चव्हाण यांनी नेहमीच नावीन्यपूर्ण संकल्पनांमधून आपल्या कार्याची छाप फुलंब्री मतदार संघावर सोडली आहे. अशा वेळी विविध पक्षांच्या नेत्यांनी आंदोलने केली, मोर्चे काढले पण लेकींच्या सुरक्षिततेची चिंता केली ती अनुराधा चव्हाण यांनीच, फक्त चिंता व्यक्त करून त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी लेकींना सुरक्षित करण्यासाठी स्वतः पुढाकार घेत सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला त्यांच्या कार्यकर्त्यांनी आणि मतदार संघातील मतदारांनी त्यांच्या परीने सहकार्य करत मोठा प्रतिसादही दिला.

मतदारांच्या मोलाच्या सहकार्यामुळे सभापती चव्हाण यांनी तब्बल दोनशे शाळात सीसीटीव्ही बसवून दिले आहे. यामुळे मतदार संघातील लाखो मुले सुरक्षित झाली असून सीसीटीव्हीची नजर असल्याने आता पालक देखील मुलांच्या काळजी करण्यापासून मुक्त झाले आहे.

मुली सुरक्षित झाल्या याचे समाधान

फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण म्हणाल्या, मुली सुरक्षित राहाव्या याबाबत तर सर्वच बोलतात. मात्र बोलन्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून मुली सुरक्षित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या प्रयत्नाला मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांनी देखील मोलाचे सहकार्य केले आहे. आतापर्यंत दोनशे शाळेत आम्ही कॅमेरे लावले असून पालकांनी अत्यंत समाधान व्यक्त केले आहे. येत्या काळात आणखी शाळेत आम्ही कॅमेरे लावणार आहोत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ ऑक्टोबर २०२४


# प्रजासत्ताक राष्ट्राचे निर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर




प्रा. डॉ. सिद्धोधन कांबळे

बिलोली

मो. ९४२०६७१७५०


विचार क्रांतीनंतर आचरणक्रांती हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनाचे प्रवर्तनतत्व होते.प्रजासत्ताक भारताची निर्मिती ही केवळ बाबासाहेबांच्या प्रतिमा अभिवादना इतकीच मर्यादित नव्हती.तर त्यांच्या विचारातील कृतिशील संचलन करण्याची जबाबदारीही आपल्यावर येऊन पडली होती.परंतु आंबेडकर अनुयायांनी आणि रिपब्लिकन नेत्यांनी बाबासाहेबांचे राष्ट्रीय विचार,त्यांचे तत्वज्ञान आचरणात उतरवले नाहीत. ज्यांच्यासाठी बाबासाहेबांनी अहोरात्र लढा दिला त्या भारतीय रिपब्लिकन जनतेनेही त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही.

भारतीय नागरिकांनी विचार,तत्त्वज्ञान व आचरण यांचा संबंध केवळ पोटाशी जोडला.त्यामुळेच राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलन दिशाहीन बनले.देश घोटाळ्यांनी पोकरून निघाला.शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे पसंत केले.आदिवासींच्या जमिनीचा प्रश्न बिकट बनला.भटक्या विमुक्तांना अजूनही गावाशी आणि देशाशी नाते जोडता आले नाही.अस्पृश्यांवरचे आणि स्त्रियांवरचे अत्याचार अजूनही थांबले.नाहीत ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही.राजकीय क्रांती ही नेहमीच सामाजिक आणि धार्मिक क्रांतीनंतरच होते,ही बाबासाहेबांची विचार दिशा,काँग्रेस प्रणित रिपब्लिकन नेत्यांनी कधीही समजून घेतली नाही.अशा स्वार्थी आंबेडकरानुयायांनी व रिपब्लिकन नेत्यांनी बाबासाहेबांचे राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलन,ब्रिटिश प्रणित काँग्रेसच्या दावणीला बांधून ते स्वत:च्या पोटाशी जोडले.हे राष्ट्रीय आंदोलन देशातील अनुसूचित जाती-जमाती,ओबीसी व धार्मिक अल्पसंख्यांकांच्या प्रश्नाशी जोडण्याचा प्रयत्न केला नाही.

बाबासाहेबांच्या राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनाची खरी ओळख एससी एसटी ओबीसी व धार्मिक अल्पसंख्यांकांचे आंदोलन अशी होती.परंतु अज्ञानातूनच रिपब्लिकन आंदोलनाला महारांचे व बौध्दांचे आंदोलन असा शिक्का गांधी-नेहरूंच्या ब्रिटिश प्रणीत काँग्रेसने मारला आणि खऱ्या भारतीयांचे राष्ट्रीय आंदोलन दिशाहीन बनवले. डॉ.बाबासाहेबांनी उभारलेल्या राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनातून प्रजासत्ताक भारत अस्तित्वात आला.मानवी स्वातंत्र्य पुर्नस्थापित झाले.स्वाभिमान पुर्नस्थापित झाला.विज्ञानाला गती मिळाली.भौतिक व सामाजिक जीवनातील निरंतरते बरोबरच सर्व मानवी पैलूंचा विकास झाला.मानवी संस्कृतीच्या संरक्षण व संवर्धनाबरोबरच संस्कृती सभ्यतेचाही विकास झाला. ब्राह्मणी मनू व्यवस्थेने नाकारलेले शिक्षण सार्वत्रिक झाले.राज्यघटनेने शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला.वैदिक संस्कृतीने विकृत आणि कलूशीत बनलेली मने,सुसंस्कृत बनण्यास मदत झाली.जाती-जाती मधील अंतर कमी होऊन,सर्व जाती मूळ राष्ट्रीय प्रवाहात सामील झाल्या.आर्थिक स्वावलंबनाचा अधिकार प्रत्येक नागरिकाला प्राप्त झाला.मनोभूमी तयार करून विचार पेरल्याशिवाय माणूस निर्माण होत नाही आणि माणसे पेरल्याशिवाय आंदोलने टिकत नाहीत हे बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर कोणीही नीटपणे समजून घेतले नाही स्वतःला आंबेडकर अनुयायी समजणाऱ्यानी बाबासाहेबांची राष्ट्रीय भूमिका नीटपणे समजून घेतली नाही. उलट गांधी आणि नेहरूंच्या ब्रिटिश प्रणित काँग्रेसच्या प्रलोभनावर,सौदेबाजीवर व पोकळ घोषणाबाजीवर चळवळीची वाटचाल चालू ठेवली.

अशा निराधार चळवळी आज विविध गटातटांमध्ये विखुरल्या गेल्या आहेत.एखादे सामाजिक राजकीय आणि आर्थिक आंदोलन पुढे चालवायचे असेल तर त्याला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असावे लागते.जसे बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनाला,भूमिपुत्र गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान होते.बुद्धाचे तत्वज्ञान ही जगाची प्रेरक शक्ती होती.कारण रोम मधील ज्यू धर्माची स्थापना मुसा मौजेस यांनी केली.हा धर्म जगातील सर्वश्रेष्ठ धर्म मानला जातो.मात्र या धर्माची स्थापना बुध्दाने सांगितलेल्या दहा पारमितांच्या आधारावर झाली आहे.येशू ख्रिस्ताच्या धर्माचा आधारही बौद्धतत्त्वज्ञानच आहे.कारण बौद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी येशू ख्रिस्ताने तक्षशिला या बौद्ध विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतला होता.आणि बोधिसत्व ही पदवी प्राप्त करून,आज पाकिस्तानात असलेल्या लडाख या ठिकाणी ते बौद्ध भिक्षू म्हणून कार्यरत होते.याचे असंख्य पुरावे,जगभर उपलब्ध आहेत.

येशूच्या खुनानंतर पाचशे वर्षांनी,ख्रिश्चन धर्माची स्थापना झाली.मोहम्मद पैगंबराचा जन्म,बुद्धाच्या १००० वर्षानंतर झाला होता. इस्लामची विचारधरा देखील बौद्धत्वज्ञानावरच आधारित आहे बौद्ध धम्माचे विकृतीकरण करून जगात अनेक धर्म उदयास आले जगातील लोकशाहीचा प्रणेता बुद्धच होता आणि बुद्ध भारताचा भूमिपुत्र आहे याचा अभिमान बाबासाहेबांना होता.म्हणूनच त्यांनी राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलनाचे अधिष्ठान,बौद्ध तत्त्वज्ञान मानले होते. म्हणजेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर त्यांचे राष्ट्रीय कार्य उभे होते.तत्त्वज्ञानाबरोबरच,आंदोलन नेहमीच निष्ठावंतांच्या खांद्यावर उभे असते.तसेच ते समर्थ भाष्यकारांच्या मेंदूवर ही जिवंत असते.आंबेडकरोत्तर रिपब्लिकन आंदोलनातून या दोन्ही बाबींची कमतरता प्रकर्षाने जाणवते.दुसरी एक महत्त्वाची बाजू म्हणजे आंदोलनाच्या तत्त्वज्ञानावर कार्यकर्त्यांचा दृढ विश्वास असावा लागतो.तरच नेतृत्वाला तात्विक भूमिकेवर खंबीरपणे उभे राहून आपले कार्यक्रम राबवता येऊ शकतात. हे अलीकडच्या रिपब्लिकन नेत्यांना जमले नाही. व या संबंधीचे कोणतेच तात्विक चिंतन आजपर्यंत नीटपणे कुणालाही करता आले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेले राष्ट्रीय रिपब्लिकन आंदोलन सबंध भारतीयांच्या मुक्तीसाठी होते. त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग हा सर्व भारतीयांसाठी स्वाभिमानाचा विषय ठरलेला आहे.सर्वात प्रथम म्हणजे इ.सन १९१६ लाच बाबासाहेबांनी ब्रिटिशांविरुध्द स्वातंत्र्याची ठिणगी पेरली होतीच.परंतु नंतरची साऊथ ब्युरो कमिशन समोर त्यांनी दिलेली साक्षही अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय (ओबीसी) व धार्मिक अल्पसंख्याकांसाठी जिवनदानच ठरले आहे. बाळ गंगाधर टिळकांनी करवीर संस्थानच्या बाहेर अथनी इथे सभा घेऊन 'तेली तांबोळी आणि कुणबटांना विधी मंडळात जाऊन काय नांगर हाकायचा आहे काय?' असा सवाल करुन बहुजनांना विरोध केला होता.तर ब्रिटिशांच्या रिक्रुटमेंट बोर्डावर कार्यरत असलेले मोहन करमचंद गांधी यांनी सायमन कमिशनला विरोध करुन,टिळकांचीच जातीयवादी आणि मनुवादी भुमिका पुढे रेटली होती.

मो.क. गांधीनी ब्रिटिश काँग्रेसचे अध्यक्षपद मिळाल्यानंतरही देशहीताची,भूमिका कधीही घेतली नाही.तर उलट ब्रिटिशांचे ब्रँड अँबॅसिडर म्हणूनच त्यांनी कार्य केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र १९१६ पासूनच देशाच्या राजकारणावर स्वत: ची छाप टाकली होती.व ब्रिटिशांविरुध्द स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले होते. म्हणून बाबासाहेबांची स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिका ही राष्ट्रीय होती तर टिळक,गांधी नेहरू यांची भूमिका जातीयवादी होती.राष्ट्रीय नेते फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच होते.कारण त्यांनी या देशातल्या ८५ टक्के भारतीयांचे व नागरिकांचे नेतृत्व केलेले होते. इतर सर्वजन ब्रिटिश काँग्रेस प्रणीत ब्राह्मणी नेते होते. वरील प्रस्थापित पुढाऱ्यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात राष्ट्रविधातक कार्य करुन एस्सी, एस.टी., ओबीसी व रिलिजिअस मायनारिटजच्या विरुध्द भूमिका घेऊन देश पेटवला.देशभरातील लोकांच्या,ब्रिटिशांच्या चेथावनी वरून देशभर हत्या घडवून आणल्या. टिळक-गांधी व नेहरु यांचे ब्रिटिशांबरोबरचे स्नेहसंबंध तर जगभर प्रसिद्ध आहेत.त्यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही.गांधी अहिंसेचे पुजारी होते व राष्ट्रपिता होते,हा अत्यंत खोटा आणि खोडसाळ अपप्रचार आहे. इतिहासातील घटनांची सुसंगत मांडणीकरुन त्या घटनांचे नीट अन्वयार्थ लावले तर ही बाब चटकन लक्षात येते.टिळक,गांधी,नेहरु यांनी स्वातंत्र्याचा लढा कधीही लढला नाही.तर देशातील बहुसंख्य नागरीकांना मिळणाऱ्या हक्क आणि अधिकारांविरुध्द रान पेटवले.

त्यालाच स्वातंत्र्याचा लढा असे नाव देऊन खोटा इतिहास लिहिला गेला.या देशातील स्वातंत्र्याचा लढा फक्त एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढला व प्रजासत्ताक भारताची निर्मिती केली.ही बाब जातीयवादी भूमिका घेणाऱ्यांना,अतिशयोक्तिचीही वाटूशकेल! परंतु हेच आजच्या इतिहासाने सांगितलेले सत्य आहे.ब्रिटिशांनी इ.सन १९०९ पासूनच भारताच्या स्वातंत्र्याची तयारी सुरु केली होती.असे असतांना देखील देशाला स्वातंत्र्यासाठी इ.सन १९४७ पर्यंत वाट का पहावी लागली ? इ.सन २६ जाने.१९३० ला देश स्वतंत्र झाल्याची घोषणा करुन,तो दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून चहूकडे साजरा करण्यात आला.तरीही पुढील सतरा वर्षाची वाटचाल कशासाठी करावी लागली? आणि कुणाच्या सांगण्यावरून करावी लागली याचे चिंतन झाले पाहिजे. व यामागील मूळ कारणांचा शोध घ्यावा लागेल.तरच खरा इतिहास कळू शकेल.साऊथ ब्युरो कमिशन,सायमन कमिशन या दोनही कमिशन सर्व भारतीयांचे हक्क आणि अधिकार निश्चित करण्यासाठी नेमण्यात आले होते.एस.सी.,एस.टी.,ओबीसी व धार्मिक अल्पसंख्याकांच्या हक्क अधिकारांविषयी ज्या शिफारशी वरील कमिशनने केल्या होत्या,त्यांना टिळक, गांधीनी विरोध का केला? इ.सन ३० जानेवारी १९३० ला गोलमेज परिषदावर बहिष्कार टाकून स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.तरीही इ.सन १९३१ ला गोलमेज परिषदेत गांधी कुणाच्या सांगण्यावरून आणि कशासाठी उपस्थित राहिले ? गोलमेज परिषदांमधून बाबासाहेबांनी मिळविलेल्या अधिकारांना गांधीनी कुणाच्या सांगण्यावरुन विरोध केला ? गांधीचे राजकीय गुरू कोण? गांधी ब्रिटिशांचे बँड अँबॅसिडर देशहितासाठी होते का ? त्यापाठीमागे अशी कोणती राष्ट्रीय भूमिका होती ? बाबासाहेबांनी मिळवलेल्या प्रौढ मताधिकाराला गांधीनी कोणत्या हेतूने विरोध केला होता? त्यात कोणती राष्ट्रीय भावना सत्य आणि अहिंसा होती ? ब्रिटिशांना इ.सन १९४२ ला चले जाव म्हणारे गांधी ब्रिटिश सरकारच्या विश्वासातले भारतीय नेते कसे काय बनले होते ?इ.सन १९४५ ला ज्या जागतिक घडामोडी घडत होत्या, त्याकडे बारकाईने लक्ष घातले तर असे समजते की, ब्रिटिशांनी भारताविरुध्द गांधी-नेहरूचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु केलेला होता.संयुक्त राष्ट्रसंघटनेची (युनो) ची स्थापना इ.सन १९४५ ला झाली.व डॉ. बाबासाहेब भांबेडकरांनी भारतासाठी युनो चे कायमस्वरुपी सभासदत्व मिळवले होते.

पुढे ते नेहरुनी विनाअट चीनला बहाल ब्रिटिशांची शाबासकी मिळवली व भारताची कायम स्वरूपी डोकेदु:खी वाढवून ठेवली. बाबासाहेबांनी मिळवलेले युनोचे सभासदत्व भारताच्या स्वाभिमानी स्वातंत्र्याचे एकमेव महत्वाचे व प्रभावी शस्त्र होते. ब्रिटिशांना ठेचण्यासाठी तीच मोठी एक नामी संधी होती.म्हणूनच ब्रिटिशांनी या देशातील धर्मव्यवस्थेचा व धर्म मानणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसचा गैरफायदा उठवत,बाबासाहेबांच्या विरुध्द गांधी, नेहरुना शस्त्र म्हणून वापरले. व बाबासाहेबांना प्रस्थापित व्यवस्थेचे लक्ष्य ठरवले.जगातील ब्रिटिशांची साम्राज्यशाही नष्ट करुन,बुध्दाची जागतिक लोकशाही व्यवस्था जगभर प्रस्थापित करण्यासाठी युनोची स्थापना झालेली होती.ही दूरदृष्टी ठेवूनच बाबासाहेबांनी युनोचे कायम स्वरूपी सभासदत्व मिळवले होते.त्याचा मोठा फायदाही भारताला झाला असता.परंतु गांधी आणि नेहरु या ब्रिटिश प्रणीत काँग्रेस नेत्यानी ब्रिटिशांच्या सांगण्यावरून ते चीनला देऊन टाकले.त्यावेळी बाबासाहेबांची ही राष्ट्रीय भूमिका भारतीय प्रबुद्ध नागरिकांनी स्वीकारली असती,तर कदाचित भारत हे राष्ट्र आज अमेरिकेच्या ठिकाणी राहून जगाचे नेतृत्व करणारे बलाढ्य राष्ट्र ठरले असते.आजही भारताची जगभर असलेली ओळख बौद्ध राष्ट्र म्हणूनच आहे. जगभरातील लोकशाही ही भारतीय असलेल्या बुद्धाची आहे.

जगातील सर्वच धर्म आणि शैक्षणिक विद्यापीठे ही बौद्ध तत्वज्ञानाची देण आहे. बौद्ध तत्वज्ञानाला जगात सर्वश्रेष्ठ स्थान आहे.जगाचा विकास हा भारतीय बौद्ध तत्वज्ञानातूनच झालेला आहे. हे केंब्रिज व कोलंबिया विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणातून सिध्द झाले आहे.एवढेच नव्हे तर संस्कृत भाषेचा जन्म हा देखील भारतीय बौद्धांच्या पालीभाषेतूनच झालेला आहे.परकीय ब्राह्मण शिक्षित बनला तो बौद्ध विद्यापीठामधूनच ! म्हणून बाबासाहेब बौद्ध तत्वज्ञानाचे समर्थक आणि पूजक होते.बाबासाहेबाचे या राष्ट्रीय कार्याची नोंद ब्रिटिश काँग्रेसने,इतिहासात होऊ दिली नाही. बाबासाहेबांना केवळ अस्पृश्योध्दारक म्हणून हिनविण्यात आले. बाबासाहेबांनी लढलेला स्वातंत्र्याचा लढा हा नेक आणि अपूर्व असा होता.गांधीनी देशातील लोकांना भावनिक बनवून हजारो लोकांच्या कत्तली घडवून आणल्या भगतसिंग, राजगुरु, सुखदेव सारख्या असंख्य भारतीय नागरिकांना व तरुणांना आत्महत्तेस प्रवृत्त केले.व त्यांच्या हत्या घडवून आणल्या.जालियनवाला बागेतील १२०० लोकांचा हत्याकांड ही त्यांच्या हिंसक प्रवृत्तीची साक्ष आहे.गांधीनी हे जाणीवपूर्वक,एससी..एस टी.ओबीसी व धार्मिक अल्पसंख्याकांच्या हक्क आणि अधिकारांना विरोध करण्यासाठीच हजारोंचे हत्याकांड घडवून आणले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र रक्ताचा एकही थेंब सांडू न देता प्रजासत्ताक भारताची निर्मिती केली. यावरुन खरा राष्ट्रभक्त कोण? हे सिद्ध होते.टिळक, गांधीनी एस.सी., एस.टी., ओबीसी आणि धार्मिक अल्पसंख्याकांना हक्क व अधिकार मिळू नयेत म्हणून इ.सन १९१९ ला मिळालेले स्वातंत्र्य धुडकवून लावले व देशातील निरपराध लोकांच्या हत्या घडवून आणल्या. तर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून प्रजासत्ताक भारताची निर्मिती केली. इ.सन १९१९ पासून सुरु असलेल्या एस.सी. एस.टी., ओबीसी व धार्मिक अल्पसंख्याकांच्या हक्क व अधिकारांना मूर्त रुप दिले.म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच या देशातले एकमेव राष्ट्रभक्त व राष्ट्रपुरुष आहेत,हे सिद्ध होते.

बाकी लोकमान्य,स्वातंत्र्यवीर,राष्ट्रपिता इत्यादी संबोधने लावून मिरवणारी मंडळी राष्ट्रद्रोही व राष्ट्रविघातक कृत्य करणारी होती हे सिद्ध करण्यासाठी कुठल्या न्यायालयाची आवश्यकता नाही.दुसरे असे की,ब्रिटिशांनी इ.सन १५ ऑगस्ट १९४७ ला घाई घाईने स्वातंत्र्य का दिले ? गांधी नेहरुनी ते का स्वीकारले? हे आजपर्यंत कुणीही समजून घेतले नाही.१५ ऑगस्ट ह्या दिनाला भारतीय इतिहासात व संस्कृतीत काही विशेष महत्व आहे काय? तो दिवस निवडतांना आम्ही भारतीय म्हणून काही विचार केला होता काय? बाबासाहेबांच्या पक्षनिवडीचा एक अपवाद सोडला तर कोणतेच महत्त्व नव्हते. कारण ब्रिटिशांनीच युनोच्या भीतीने व स्वातंत्र्यासाठी जागतिक दबाव वाढवल्यामुळे इ.सन १५ ऑगस्ट १९४७ ही तारीख निवडली.या तारखेला भारतीयांच्या दृष्टीने काहीच महत्व नसले तरी ब्रिटिशांच्या दृष्टीने खूप महत्व आहे.कारण १५ ऑगस्ट या तारखेला राणी एलिजाबेथ राणीच्या नातवाचा वाढ दिवस होता.तोच दिवस आम्ही सर्व भारतीय आजही स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करत आहोत.आम्हाला राष्ट्रगीतही नाही,आजचे जे राष्ट्रगीत म्हणून अस्तित्वात आहे,ते पंचम जॉर्जच्या भारतातील आगमनाप्रित्यर्थ रविंद्रनाथ टागोरांनी लिहिलेले स्वागत गीत आहे.तेच आम्ही राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले.ही बाब खऱ्या स्वाभिमानी भारतीयांसाठी किती संतापजनक आहे. याची कल्पना न केलेली बरी!आपला जो राष्ट्रध्वज मात्र बाबासाहेबांनी इ.सन २२ जुलै १९४७ ला तयार केला.हा राष्ट्रध्वज जागतिक बौद्ध भारताचे प्रतीक आहे.कोणत्याही लोकशाही राष्ट्राचा ध्वज हा एकरंगी नसतो.भारतातील बौध्द तत्वज्ञानाचे प्रतीक म्हणून पंचवीस पेक्षा अधिक राष्ट्रांचे राष्ट्रध्वज हे तीन पेक्षा अधिक रंगाचे आहेत.आपल्या राष्ट्रध्वजावरील धम्मचक्र हे बौद्धांचे व गतिमानतेचे जागतिक प्रतीक आहे.

भारताच्या राष्ट्रध्वजाला राष्ट्रीय स्वंयसेवक संघ,हिंदू महासभा, कम्युनिष्टां बरोबरच मो. क. गांधी यांनी नकार दिला गांधीनी तर त्यांच्या 'यंग इंडियातून' या राष्ट्रध्वजाला मी कधीही सलाम करणार नाही असे म्हटले होते.तरीही राष्ट्रध्वज आणि गांधी एकत्र कसे काय वावरतात ? ज्या गांधीनी राष्ट्रध्वज नाकारला त्या गांधीची प्रतिमा राष्ट्रध्वजाखाली न ठेवता राष्ट्रनिर्माते, व राष्ट्रध्वजाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा ठेवण्यात येवून या खऱ्या राष्ट्रभक्ताला मानवंदना देण्यात आली पाहिजे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे अखंडत्व जोपासण्यासाठी शतकानुशतकें स्वाभिमानशून्य जगणाऱ्या भारतीय समाजाला मुक्त करण्यासाठी,त्यांचे संघटन करण्यासाठी भारताचे संविधान लिहिले.भारतीय संविधान प्रत्येक माणसाला नैसर्गिक माणूसपण देते. स्वतंत्रपणे जगण्याचे हक्क त्यांना देते. भारतीय नागरिकांना सन्मानाने जगायला शिकवते.

समता,स्वातंत्र्य,बंधुत्व आणि सामाजिक न्याय हे मानवतावादी मूल्य लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे याची जाणीव करून देते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही तत्त्वप्रणाली,राष्ट्रहित आणि त्याहीपलीकडे माणूसहित प्रमाण मानणारी आहे.लोकशाही माणसाला केवळ अधिकारच देत नाही तर जीवनमूल्यही देते.ही मूल्याधिष्ठित लोकशाही म्हणजे परकीय ब्राह्मणी मनूच्या प्रतिक्रांतीला दिलेले क्रांतिप्रेरक उत्तर आहे.पूर्णाशांने लोकशाहीचा अवलंब केला तर प्रतिक्रांतीवादी विचार समूळ नष्ट होऊ शकतो,परंतु शतकानुशतकाच्या गुलाम मानसिकतेत अडकलेल्यांच्या हाती राजकीय लोकशाही गेली व त्यांनी अनेक अडचणी निर्माण केल्या. या राजकीय शक्तीमुळे सामाजिक लोकशाही प्रतिक्रांतिवाद्यांनी रोखण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. याला प्रत्युत्तर देता येते, मात्र त्यासाठी सत्य,निष्ठा आणि त्यागवृत्ती अंगिकारण्याची आवश्यकता आहे.परकीय ब्राह्मणी मनूची धर्मव्यवस्था सत्तासंघर्षाचाच एक भाग आहे,हे निष्ठापूर्वक समजून घेतले पाहिजे. एवढेच नव्हे तर मनूचा धर्म सामाजिक,सांस्कृतिक,आर्थिक आंतकवाद फैलावतो. त्याच्या आधारावर माणसांचे शोषण करतो, ब्राह्मणहितासाठी भारतीय शेतकरी आणि स्त्रियांना बळी देणारा मनूधर्म साम्राज्यवादाच्या चष्म्यातून भारताकडे एक वसाहत म्हणूनच पाहतो, त्यामुळे भारताचा सांस्कृतिक,साहित्यिक आणि मानसिक उत्कर्ष होऊ शकला नाही.भारताच्या आजच्या समस्याप्रधान परिस्थितीला (ब्राह्मणी) मनूधर्म सर्वस्वी जबाबदार आहे.

या समाजविघातक मनुधर्माचा आणि वैदिक ब्राह्मणी संस्कृतीचा त्याग करणे राष्ट्रहिताचे होईल,अन्यथा क्रांतीनंतर पुन्हा प्रतिक्रांती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.एका हातात मनुस्मृती आणि दुसऱ्या हातात राज्यघटना घेऊन राष्ट्रोन्नती साधतायेणार नाही,असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केले होते.आज नेमकी तिच परिस्थिती निर्माण झाली आहे.ही परिस्थिती राष्ट्रविघातकच मानली पाहिजे. इ.सन २५ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाला अंतिम मान्यता देण्यासाठी भरलेल्या अधिवेशनात,संविधान निर्मात्याने एक भीती व्यक्त केली होती त्यावेळी ते म्हणाले होते, 'धर्मामध्ये भक्ती ही आत्म्याला मुक्ती मिळविण्याचा मार्ग असू शकेल,परंतु राजकारणात भक्ती अथवा विभूतीपूजा हा अधोगतीचा आणि अंतीम हुकूमशाहीचा मार्ग आहे.' आज हीच परिस्थिती सर्वत्र पाहायला मिळते.सार्वभौम लोकसत्तात्मक राष्ट्रामध्ये ब्राह्मणी धर्माची हुकूमशाही मनू धर्मामुळे वाढत चालली आहे. गगनचुंबी महागाई, बेरोजगारी,बळावत चाललेली आहे.हे लोकशाही विरोधी कृत्य म्हणजे प्रतिक्रांती होय,आजचा धर्मांध आणि व्यक्तीपूजक देश म्हणजे लोकविघातक धर्मकृत्याचे ब्राह्मणी फलित आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीवादी भूमिका आणि चळवळ भारतीय नागरिकांचे हित साधणारी,राष्ट्रहित राष्ट्रहित जोपासणारी राष्ट्रीय घटना मानली पाहिजे,हाच क्रांती आणि प्रतिक्रांती यातला मूलभूत फरक आहे.भारतीय लोकशाहीविषयक दृष्टिकोन हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानाचा भाग होता.ते म्हणतात, 'लोकांच्या राजकीय, सामाजिक जीवनात रक्ताचा एकही थेंब न गाळता क्रांतिकारक बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही', बाबासाहेबांचा हा सम्यक दृष्टिकोन संबंध भारतीयांच्या मुक्तीचा केंद्रबिंदू होता.या देशातल्या सर्व वंचितांच्या वेदनांची जाणीव,आक्रोशाचा अर्थ त्यांना समजला होता.विषम व्यवस्थेच्या निर्मुलनाशिवाय ब्राह्मणांचा सत्तासंघर्ष संपुष्टात येणार नाही,या वास्तवाची कल्पनाही त्यांना होती,म्हणूनच बाबासाहेबांनी भारतीय लोकशाहीवर अतोनात प्रेम केले.लोकशाही शोषणमुक्त समाज निर्माण करणारे एक प्रभावी शस्त्र आहे.लोकशाहीच्या मुळाशी मानवी व्यक्तिमत्त्वाबद्दल आदरभाव आणि समता हे तत्त्व आहे. 'फिलॉसॉफी अँड हिंदुइझम' या निबंधात बाबासाहेबांनी त्याचा उल्लेखही केला आहे.धर्माच्या गोंडस बुरख्याखाली दडलेली परकीय ब्राह्मणांची एकाधिकारशाही संपुष्टात आणण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लोकशाही होय.

त्यामुळेच लोकशाही अस्तित्वात असलेल्या राष्ट्रात प्रत्येक माणसाला मतदानाचा अधिकार आहे. शिक्षणाचा अधिकार आहे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे,हा अधिकार म्हणजे अस्मिता आणि स्वाभिमानाचा शक्तिशाली अविष्कार आहे.जे अमर्याद सत्ता भोगतात, लोकांचे शोषण करतात,त्यांना पदच्युत करण्यासाठी कोणता कार्यक्रम विचारवंतांनी आजवर हाती घेतला आहे? या प्रश्नाचे उत्तर फार गांभीर्यपूर्वक शोधले पाहिजे.प्रत्येक विचारवंत आणि कार्यकर्ता 'तडजोडी' स्वीकारण्यात गुंतला आहे. वेतनभोगी बनला आहे.या 'तडजोडी' लोकशाही व्यवस्थेला व विचारधारेला मारक आहेत.माणसांचे नैसर्गिक हक्क जोपासणारी लोकशाही अयशस्वी ठरली,तर सुमती भार्गव लिखित मनुस्मृतीची मूल्यहीन व्यवस्था पोसली जाईल आणि शतकानुशतकाचे पारतंत्र्य,दारिद्र्य,गुलामगिरी पुन्हा वाट्याला येईल.अशी व्यवस्था देशाला परवडणारी नाही. राष्ट्राची शकले होतील.अखंड भारताचे अनेक देश अस्तित्वात येतील.हे नुकसान कधीच भरून न येणारे असल्यामुळे लोकशाही, विज्ञानावर आधारलेले शिक्षण,संसद आणि संविधानाचे संरक्षण करता आले पाहिजे.विविधतेने नटलेल्या,अंखड भारताचे स्वप्न पाहणे म्हणजे, ब्राह्मणी विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. विविधतेने नटलेल्या भारताचे स्वप्न रंगवणे हा लोकशाहीवर चढवण्यात आलेला वैदिक मुलामा आहे. खरे तर विविधता आणि अंखंडत्व या दोन्ही गोष्टी टोकाच्या भिन्न आहेत.तरीही याची सांगड घालण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'फोडा आणि झोडा' या परकीय नीतीचा आविष्कार करणे होय.

व्यक्तीपेक्षा विचार आणि देश मोठा आहे ही राष्ट्रनिर्मात्या बाबासाहेबांची विचारप्रणाली होती.त्यांची ही कृतिशील विचारप्रणाली केवळ विचारप्रणालीच राहिली नाही तर ती कृतिप्रणालीही बनली. बाबासाहेब पहिल्यांदा कृती करीत आणि नंतरच त्यासंबंधीचा तर्कशुद्ध विचार मांडत.म्हणून बाबासाहेबांनी उचललेले प्रत्येक पाऊल राष्ट्रीय कृतीचे होते राष्ट्रीय सन्मानाचे होते.परंतु तो दर्जा त्यांच्या कृतीला मिळू दिला गेला नाही.जातीच्या चष्म्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची,राष्ट्रीय भूमिका तपासली गेली.हा अपराध एकविसाव्या शतकातही राजरोसपणे केला जातो,याची चीड येते. आणि खंत ही वाटते.देशाच्या विघटनाविरुद्ध,विषम तत्त्वप्रणालीविरुद्ध आणि मूल्यहीन धर्मांध संस्कृतीविरुद्ध लढण्यात बाबासाहेबांनी रक्ताचा थेंबन् थेंब आटवला,परंतु 'हिंदू व्यवथेविरुद्ध बाबासाहेब' असे समीकरण पुढे करून स्वतःला हिंदू समजणाऱ्या भारतीयांच्याही मनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विषयी खोटा द्वेष निर्माण केला.खरे तर डॉ.बाबासाहेबांनी धर्मांतर केले तेही राष्ट्रहित लक्षात घेऊनच! यात मतभेद असण्याचे काही कारण नाही.ते बावीस प्रतिज्ञेपैकी एका प्रतिज्ञेत म्हणतात, 'मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो.' यावरून बाबासाहेबांची विचारनिष्ठा आणि देशनिष्ठा आपल्या लक्षात येते.स्वदेशाच्या चळवळीपेक्षा भारतीय नागरिकांच्या उत्कर्षासाठी अहोरात्र संघर्ष करणे अवघड होते. कोणताही आड पडदा न ठेवता भारतीय नागरिकांच्या सन्मानासाठी अहोरात्र झगडणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव राष्ट्रपुरुष होते.की ज्यांना निर्विवादपणे राष्ट्रनिर्माते म्हटले जाऊ शकते.मात्र मूल्यहीन संस्कृतीच्या धर्मांध ठेकेदारांनी त्यांना राष्ट्रदोही म्हणण्याचेही क्रूरकर्म केले.